# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## शहरी परिवर्तनासाठी ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट (TOD) बळकट करण्यासाठी ५ दिवसीय कार्यशाळेला सुरुवात




नागपूर: गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय (MoHUA) यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो) तर्फे 'भारतीय शहरांतील शहरी परिवर्तनासाठी ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट (TOD) बळकट करणे' या विषयावर ५ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन एअरपोर्ट साऊथ मेट्रो स्टेशन (कन्व्हेन्शन हॉल) येथे करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन आज महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री. अनिलकुमार कोकाटे तसेच सीईपीटी विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स इन अर्बन ट्रान्सपोर्ट (CoE-UT) चे संचालक एमेरिटस प्रा. शिवानंद स्वामी उपस्थित होते.

आशियाई विकास बँक (ADB), सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल प्लॅनिंग अँड टेक्नॉलॉजी (CEPT) विद्यापीठ, अर्बन रेसिलियन्स ट्रस्ट फंड आणि यूके इंटरनॅशनल डेव्हलपमेंट हे या कार्यक्रमाचे सह-आयोजक आहेत. पाच दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेत शहरीकरण, वाढणारे महानगरीय क्षेत्र आणि ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट (TOD) चे महत्त्व यासंबंधी विविध मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

कार्यशाळेला संबोधित करताना श्री. हर्डीकर यांनी शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्याची गरज अधोरेखित केली. विकासापूर्वी नियोजन हे नेहमीच आणि नियमाप्रमाणे असले पाहिजे, असे ते म्हणाले. नगररचना, क्षेत्र विकास यांसारख्या बाबी नियोजनाच्या टप्प्यातच हाताळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पिंपरी-चिंचवड शहराचे उदाहरण देत, तेथे पूर्वनियोजनामुळे मोठ्या समस्या कशा सोडवण्यात आल्या, हे त्यांनी स्पष्ट केले.

मेट्रो मार्गालगत घनतेत वाढ सुनिश्चित करण्यासाठी ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट धोरणाची अंमलबजावणी करणे आवश्यक असले, तरी त्याचवेळी शहरातील गर्दी कमी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. पुनर्विकासाच्या टप्प्यातील इमारती आणि या दुहेरी समस्या ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट धोरण राबविताना हाताळाव्या लागतील, असे त्यांनी सांगितले. यासाठी बाजारातील घटक आणि शहरातील नेतृत्वाशी सल्लामसलत करून काम करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ऑनलाईन माध्यमातून उपस्थित राहून, सौ. डी. थारा, अतिरिक्त सचिव, गृहनिर्माण व नगरविकास यांनी पादचाऱ्यांना सुलभ प्रवेश देण्यासाठी समन्वयित प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. आशियाई विकास बँक – भारत यांच्या कंट्री डायरेक्टर सौ. मियो ओका यांनीही ऑनलाईन माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधला.

ब्रिटिश डेप्युटी हाय कमिशन, मुंबई येथील राजकीय व द्विपक्षीय व्यवहार प्रमुख श्री. जॉन निकेल यांनी यूके फॉरेन, कॉमनवेल्थ अँड डेव्हलपमेंट ऑफिसच्या वतीने ऑनलाईन माध्यमातून सहभागी प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. या ५ दिवसीय कार्यशाळेत महा मेट्रो, नागपूर महानगरपालिका, आशियाई विकास बँक, आशियाई विकास बँक तसेच विविध खासगी व शासकीय संस्थांतील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत..